न्यायनिर्णय वि.बा.अ.प्र.स.ख.क्र.२३/२०२५
शासन -वि- शरद व १

दाखल दिनांक : ०३/०४/२०२५

नोंदणी दिनांक : ०३/०४/२०२५

निकाल दिनांक : ०६/०६/२०२६

कालावधी : वर्षे महिने दिवस
०१ ०२ ०३

**निशाणी क्रमांक :४२**

| | | |
|---|---|---|
| | **अतिरिक्त सत्र न्यायाधीश, वाशिम यांचे न्यायालय**<br>(पिठासीन अधिकारी एम.एस. सहस्त्रबुध्दे)<br><br>(न्यायनिर्णय दिनांक ०६ जुन २०२६ रोजी पारीत)<br><br>**विशेष बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक सत्र खटला क्रं.२३/२०२५**<br>**CNR No. MHWS010003462025** | |
| | गुन्हा क्रमांक २६/२०२५<br>पोलीस स्टेशन अनसिंग | |
| **फिर्यादी/**<br>**अभियोग पक्ष** | : | महाराष्ट्र शासन<br>मार्फत पोलीस स्टेशन अधिकारी<br>पोलीस स्टेशन अनसिंग |
| **आरोपी** | १ | शरद आकाश इंगोले<br>वय २७ वर्षे कामधंदा शिक्षण |
| | २ | अमर शाम भगत<br>वय २१ वर्षे, कामधंदा - मजूरी |
| **प्रतिनिधित्व** | : | श्रीमती एम. टी. मिसर, सहायक सरकारी वकील, सरकार तर्फे. |
| **प्रतिनिधित्व** | : | आरोपी क्र. १ करीता वकील श्रीमती जि.टी.कांबळे<br><br>आरोपी क्र.२ करीता वकील श्री.डि.आर.पडघान |

## **भाग – ब**

| | |
|---|---|
| घटना दिनांक | ०६/०२/२०२५ |
| प्रथम खबरी अहवाल दाखल तारीख | ०७.०२.२०२५ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | ०३.०४.२०२५ |
| दोषारोपणाची तारीख | १९.०६.२०२५ |
| पुरावा सुरु होण्याची तारीख | २०.०१.२०२६ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | ०६.०६.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०६.०६.२०२६ |
| शिक्षा, काही असेल तर, देण्याची तारीख | -- |

## **आरोपीचा तपशील**

| आ. क्रं. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जमानतीवर सोडल्याची तारीख | दोषारोप ठेवण्यात आलेले कलम | निर्दोष सुटका झाली कि दोषी ठरविले | शिक्षा कोणती दिली | फौ.प्र.सं.चे कलम ४२८ प्रमाणे शिक्षेत सुट देण्याकरीता खटला दरम्यान कारागृहात असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | शरद आकाश इंगोले | २०.०२. २०२५ | ०३.०३. २०२५ | ७४, ७८, ३(५) भारतीय न्याय संहिता व बालकांचे लैंगिक अपराधापासुन संरक्षण अधिनियम कलम ८ व १२ अन्वये | निर्दोष सुटका झाली | -- | -- |
| २ | अमर शाम भगत | २०/०२/२०२५ | ०३/०३/२०२५ | ७४, ७८, ३(५) भारतीय न्याय संहिता व बालकांचे लैंगिक अपराधापासुन संरक्षण अधिनियम कलम ८ व १२ अन्वये | निर्दोष सुटका झाली | -- | -- |

## भाग – क

**अ. सरकारी साक्षीदार** :

| साक्षीदार क्रमांक | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्रं.१ | अ | फिर्यादी/पिडीता |
| सा.क्रं.२ | ब | साक्षीदार |
| सा.क्रं.३ | मनिषा शामराव वाघमारे | पोलिस कॉन्स्टेबल |

अभियोग पक्षाने खालील दस्तऐवज सिध्द केले.

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | नि ३७ | तक्रार |

**ब. बचावाचे साक्षीदार** :

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**क. न्यायालयाचे निशाणी** :

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**ड. भौतिक वस्तु** :

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**न्यायनिर्णय**

*(दिनांक ०६ जुन २०२६ रोजी पारीत)*

प्रस्तूत प्रकरणात दोन्ही आरोपींविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम ७४, ७८, ३(५) भारतीय न्याय संहिता व बालकांचे लैंगिक अपराधापासुन संरक्षण अधिनियम कलम ८ व १२ अन्वये दोषारोपण करण्यात आलेले आहे.

२. सदरचे प्रकरण बाल लैंगिक अत्याचार अधिनियमाअंतर्गत असल्यामुळे पिडीतेची ओळख कुणाला कळु नये या उद्वेशाने, तिच्या परिवारातील सदस्यांचे नाव गोपनिय ठेवुन पिडीतेला 'अ' आणि तिच्या काकांना 'ब' या नावाने संबाोधण्यात येत आहे.

३. अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत अशी आहे की –

फिर्यादी ही स्वतः पिडीता आहे. तिने फिर्याद दिली की, ती इयत्ता आठवी मध्ये शिकते. शाळेत जात असताना दोन्ही आरोपी नेहमी तिचा पाठलाग करुन तिला त्रास देत होते. दि.०६/०२/२०२५ रोजी सकाळी १० वा. पिडीता शाळेत जात असताना आरोपींनी तिचा पाठलाग केला. दोन्ही आरोपींनी ग्रामपंचायतच्या विहीरीजवळ त्यांची मोटरसायकल पिडीतेचे समोर आडवी लावली. आरोपी शरद इंगोले गाडीवरुन उतरला व

त्याने पिडीतेचा उजवा हात धरुन म्हटले की ती त्याला खुप आवडते. पिडीतेने त्याचा हात झटकला व दोन्ही आरोपींना म्हटले की ती त्यांचे नाव तिचे काकांना सांगेल.

हे ऐकूण दोन्ही आरोपी तेथून निघून गेले. त्यानंतर पिडीता घाबरुन शाळेत गेली व सदरची घटना तिने भितीपोटी कोणालाही सांगितली नाही. परंतु दुस–या दिवशी ती घटना परत होईल या भितीने तिने सदरच्या घटनेबाबत तिचे काकांना सकाळी १०.३० च्या सुमारास सांगितले. त्यानंतर तिने तिचे काकांसोबत जावून सदरच्या घटनेची तक्रार पोलिस स्टेशन अनसिंग येथे दिली त्यावरुन ७४, ७८, ३(५)भारतीय न्याय संहिता व बालकांचे लैंगिक अपराधापासुन संरक्षण अधिनियम कलम ८ व १२ अन्वये गुन्हा क्र.२६/२०२५ प्रमाणे दाखल करण्यात आला.

४. फिर्यादीच्या तक्रारीवरुन दाखल झालेल्या गुन्हयाचा तपास सहायक पोलीस उपनिरीक्षक कविता नांगरे पोलीस ठाणे अनसिंग यांना देण्यात आला. तपास अधिकारी यांनी तपासा दरम्यान पिडीता, तिचे काका व इतर साक्षीदारांचे जवाब नोंदविले, घटनास्थळाचा पंचनामा केला, फिर्यादी–अ चे जन्माचा दाखला व इतर कागदपत्र् गोळा केले, फौ.प्र.सं. कलम १६४ चे बयाण नोंदविण्यासाठी न्यायदंडाधिकारी यांच्याशी पत्र व्यवहार केला. त्यानंत आरोपींना अटक केली व तपासाअंती आरोपी विरुध्द भरपुर पुरावा मिळून आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र् सादर केले. ७४, ७८, ३(५)भारतीय न्याय संहिता व कलम ८ व १२ बालकांचे लैंगिक अपराधापासुन संरक्षण अधिनियम या अपराधाबाबतचे आरोप निश्चित केले व सदरचे आरोप, आरोपींना वाचून व समजावून सांगण्यात आले. मात्र, आरोपींनी ते कबूल केले नसल्याने सदरचा खटला चालविण्यात आला.

५. सदरहू प्रकरणात आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने **भाग – क** प्रमाणे नमुद एकुण तिन साक्षीदारांची साक्ष नोंदविली. या व्यतिरीक्त अभियोग पक्षाने आरोपीविरुध दोषारोप सिध्द करण्याकरीता **भाग – क** प्रमाणे नमुद कागदपत्रंवर भिस्त ठेवली.

६. आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ अन्वये अनुक्रमे नि.क्रं.३८ व ३९ प्रमाणे बयान नोंदविण्यात आले. आरोपींनी त्यांना खोटया गुन्हयात फसविण्यात आल्याचा बचाव घेतला. आरोपींनी त्यांच्या बचावाकरीता कोणताही साक्ष पुरावा दिला नाही.

७. सहायक सरकारी वकील श्रीमती एम. टी. मिसार व आरोपींचे वकील श्री. डि.आर.पडघान व श्रीमती जि.टी.कांबळे यांचा युक्तिवाद ऐकला. सरकारी पक्षाचा खटला, आरोपींचा बचाव व प्रकरणात दाखल असलेल्या कागदपत्रांवरुन खालील मुद्दे विचारार्थ घेण्यात आले. त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसासहीत खालील प्रमाणे नोंदवित आहे.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, दि.०६/०२/२०२५ रोजी सकाळी १० वाजताच्या सुमारास मौजे उकळीपे येथे आरोपींनी संगनमत करुन फौजदारी बलप्रयोग करुन फिर्यादी/पिडीतेचा विनयभंग केला ? | नाही. |
| २ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन | |

| | | |
|---|---|---|
| | पिडीता ही तिच्या शाळेत जात असतांना तिचेवर पाळत ठेवली ? | नाही. |
| ३ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी पिडीता ही अल्पवीयन असतांना तिच्यावर लैंगिक अत्याचार केला ? | नाही. |
| ४ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी पिडीता हिचा लैंगिक छळ केला ? | नाही. |
| ५ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ ते ५ बाबत** :-

८. सर्व मुदृदयांवरील विवेचण एकमेकांशी संलग्न असल्यामुळे, विवेचणाची पुनारावृत्ती टाळण्याकरीता सर्व मुद्दे एकत्रीतरित्या चर्चेकरीता घेतले आहेत.

९. सदरचे प्रकरण बाल लैंगिक अत्याचार अधिनियम अंतर्गत दाखल असल्यामुळे व पिडीतेचे वय घटनेच्या वेळेस म्हणजेच दिनांक ०६/०२/२०२५ रोजी १८ पेक्षा कमी असल्याचे अभियोग पक्षाचे म्हणणे असल्यामुळे त्या संदर्भात, अभिलेखावर दाखल पुराव्याचे विवेचन सर्व प्रथम करणे गरजेचे आहे. पिडीतेने तिच्या वयासंदर्भात, तिच्या पुराव्यात काहीही सांगीतले नाही. पिडीतेच्या वयासंदर्भात अभियोग पक्षाने कोणताही कागदोपत्री पुरावा किंवा साक्ष पुरावा अभिलेखावर आणला नाही. त्यामुळे

पिडीतेचे वय १८ वर्षापेक्षा कमी असल्याचे स्पष्टपणे व निर्वीवादपणे अभियोग पक्ष सिध्द करु शकलेला नाही.

१०. अभियोग पक्षाने तपासलेला साक्षीदार क्र.१ फिर्यादी–अ आणि साक्षीदार क्र.२ पिडीते काका–ब यांनी त्यांच्या सरतपासात सांगीतले की, पिडीतेने पोलिस स्टेशनला तक्रार दिली होती. परंतु पिडीतेने तिच्या तक्रारीत नमूद असल्याप्रमाणे कुठलीही घटना घडली नसल्याचे सांगितले आहे. सदर साक्षीदाराचा सखोल उलटतपास अभियोगपक्षातर्फे नोंदविण्यात आला. परंतु कुठलीही महत्वाची कबूली अभिलेखावर आली नाही. सदर घटनेची पिडीता एकमेव साक्षीदार आहे. पिडीतेचे काका साक्षीदार ब यांनी सुध्दा त्यांना घटनेबाबत पिडीतेने सांगितले असल्याचे कबूल केले आहे त्यामुळे ते घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाहीत. वर उल्लेख केल्याप्रमाणे सदर घटनेची पिडीता ही एकमेव साक्षीदार आहे परंतु तिने कुठलीही घटना घडली नसल्याचे सांगून अभियोग पक्षाची मदत केली नाही.

११. या व्यतिरीक्त अभियोग पक्षाने पोलिस कॉन्स्टेबल मनिषा वाघमारे साक्षीदार क्र.३ यांचा जवाब नोंदविला आहे. या साक्षीदाराने तिचे पुराव्यात पिडीता हिची तक्रार तिचे सांगण्यानुसार नोंदविली असल्याचे स्पष्ट केले आहे. परंतु पिडीता हिने कुठलीही घटना घडली नसल्याचे सांगितल्यामुळे केवळ या साक्षदाराच्या पुराव्यावरुन आरोपींविरुध्द दोषारोप सिध्द झाले असे म्हणता येणार नाही. या व्यतिरिक्त अभियोग पक्षाने कुठलाही साक्षीदार तपासला नाही.

१२. तपासण्यात आलेल्या साक्षीदारांच्या पुराव्यावरुन आरोपींनी पिडीता हिचा पाठलाग केल्याचे व तिचा हात पकडून तिच्यावर लैंगिक अत्याचार व तिचा छळ केल्याचे

सिध्द झालेले नाही. त्यामुळे आरोपींविरुध्द कुठलाही दोषारोप सिध्द होत नाही.

१३. एकंदरीत अभिलेखावर आलेल्या एकुण पुराव्यावरुन अभियोग पक्ष, घटनेच्या वेळेस पिडीता अल्पवयीन असल्याचे व तिचा लैंगिक छळ झाल्याचे सिध्द करण्यास असमर्थ ठरला आहे, या निष्कर्षाप्रत मी पोहचले आहे. त्यामुळे आरोपींविरुध्द लावलेले दोषारोप स्पष्टपणे व निर्वीवादपणे अभियोग पक्ष सिध्द करु शकलेला नाही. त्यानुसार आरोपी हे दोषमुक्त होण्यात पात्र् आहेत. सबब मुद्दा क्र.१ ते ५ चे उत्तर नकारार्थी देण्यात येते.

**<u>मुद्दा क्रं.६ बाबत</u>** :–

१४. वरील विवेचणांवरुन मुद्दा क्रं.१ ते ५ चे उत्तर नकारार्थी देण्यात आले आहे. सबब, मुद्दा क्रं.६ करीता मी खालील आदेश पारित करीत आहे –

## आदेश

अ. आरोपी नामे शरद आकाश इंगोले व अमर शाम भगत यांची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २३५(१) अन्वये ७४, ७८, ३(५) भारतीय न्याय संहिता आणि बालकांचे लैंगिक अपराधापासुन संरक्षण अधिनियम कलम ८ व १२ मधुन दोषमुक्त करण्यात आले आहे.

ब. आरोपींचे जामीनपत्र व जातमुचलका पत्र रद्द करण्यात येत आहे.

क. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७(१) अन्वये रुपये २५,०००/–(रुपये पंचवीस हजार फक्त) प्रत्येकीचे नविन जामीन–पत्र दयावे. सदर जामीनपत्र पुढील सहा महिन्यापर्यंत अंमलात राहिल.

ड. न्यायनिर्णय खुल्या कक्षेत घोषीत करण्यात आला.

MOULASHRI SHIRISH SAHASRABUDHE
Digitally signed by MOULASHRI SHIRISH SAHASRABUDHE
Date: 2026.06.06 19:08:36 +0530

ठिकाणः वाशिम (एम.एस. सहस्त्रबुध्दे)
दिनांक: ०६/०६/२०२६ अति. सत्र न्यायाधीश,वाशिम.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same word to word, as per the original order :-

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | :- | R.K.Pawar, Stenographer (Grade-1) |
| Court Name | :- | District Judge-3 & Additional Sessions Judge, Washim |
| Date | :- | 06/06/2026 |
| Order signed by the Presiding Officer on | :- | 06/06/2026 |
| Order uploaded on | :- | 06/06/2026 |